नवराष्ट्र
Ratnagiri-Sindhudurg | 30 October 2026 | Page 3

सेवाभाव : फिनोलेक्स इंडस्ट्रीज अ... मुकुल माधव फाउंडेशनचा आडिवरे येथे उपक्रम

कर्तव्य प्रतिष्ठानला वैद्यकीय उपकरणे

ग्रामीण भागातील गरजुंना स्थानिक स्तरावर सुविधा

रत्नागिरी (वा) ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना स्थानिक स्तरावर वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि आरोग्यसेवेसाठी आवश्यक साहित्याची कमतरता दूर व्हावी, या उद्देशाने फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि तिचे सामाजिक दायित्व भागीदार मुकुल माधव फाउंडेशन यांच्यावतीने राजापूर तालुक्यातील आडिवरे येथील कर्तव्य प्रतिष्ठानला विविध वैद्यकीय उपकरणे प्रदान करण्यात आली. या उपक्रमामुळे आडिवरेसह परिसरातील गरजू रुग्णांना आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध होण्यास हातभार लागणार आहे.



कंपनीने सामाजिक बांधिलकीतून राबवला उपक्रम

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे. कर्तव्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून या उपकरणांचा उपयोग आडिवरे आणि परिसरातील गरजू नागरिकांसाठी करता येणार आहे.

आवश्यक वैद्यकीय उपकरणांचे वितरण या उपक्रमांतर्गत कर्तव्य प्रतिष्ठानला फोल्डिंग बेड, व्हीलचेअर, कमोड चेअर, शवपेटी, स्ट्रेचर यांसह अन्य आवश्यक वैद्यकीय उपकरणे देण्यात आली. या साहित्याचा उपयोग रुग्णांची देखभाल, त्यांची ने-आण तसेच गरजू कुटुंबांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी होणार आहे. त्यामुळे कुटुंबीयांची गैरसोय कमी होईल.